बीड । महाराष्ट्र
रविवार दि. १५ मार्च २०२६
वर्ष ५ वे । अंक ३४३
पान १ । पाने ४
किंमत ३ रूपये

दैनिक
# मराठवाडा पत्र

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955 E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://marathwadapatra.com | https://epaper.marathwadapatra.com

## झोपलेल्या अल्पवयीन विवाहितेला उचलून नेले...

# अत्याचार केला चावडीच्या खांबाला बांधून आरोपी पळाला

**बीड । प्रतिनिधी**

घरामध्ये झोपलेल्या अल्पवयीन विवाहितेला उचलून गावाबाहेर नेले.तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्यानंतर तिला गावामध्ये आणले व गावच्या चावडीवर खांबाला बांधून ठेवल्याचा प्रकार सकाळी समोर आल्यानंतर गावकऱ्यांनी या विवाहितेची सुटका केली. या घटनेने खळबळ माजली आहे.

पिंपळनेर पोलीस ठाणे हद्दीतील एका गावात घडलेल्या घटनेने कायदा सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अल्पवयीन विवाहिता अकरा मार्च रोजी आपल्या घरात झोपलेली होती. यावेळी वैभव पटेकर याने तिला उचलून नेले. नदी कडील भागात नेऊन तिच्यावर बलात्कार केला. घरातून उचलून घेऊन जात असताना तिने विरोध देखील केला मात्र तिचं तोंड दाबून धरण्यात आल्यामुळे प्रतिकार कमी पडला गेला. तिच्यावर अत्याचार केल्यानंतर तिला गावात



आणून चावडीवरील खांबाला बांधून टाकले. ही घटना सकाळी ग्रामस्थांनी पीडीतेला खांबाला बांधल्याचं पाहिल्यानंतर घटना उघडकीस आली. गावचे सरपंच व पिडीतेच्या कुटुंबातील सदस्य चावडीवर आल्यानंतरच तिला सोडवण्यात आले. दरम्यान या घटनेने विवाहिता प्रचंड घाबरलेली होती, त्यामुळे तिने पोलीसात तक्रार दिली नाही. त्यानंतर, आज कुटुंबीयांना ही घटना संपूर्ण घटना सांगितल्यानंतर पीडित अल्पवयीन विवाहितेने पोलिसांत फिर्याद दिली. त्यानंतर आरोपीला अटक करण्यात आली असून न्यायालयाने आरोपीला १७ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणी पिंपळनेर पोलिसांसह पिंक पथकाकडून तपास केला जातोय. परंतु या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. पीडिता ही अल्पवयीन असल्याने आरोपीवर पोक्सो कायद्यांतर्गत कारवाई केली जाणार असल्याची माहिती आहे.

## अल्पवयीन मुलीला घरात बोलावून हातपाय बांधून पाशवी बलात्कार

**परळी । प्रतिनिधी**



घरात बोलावून घेत तोंडात बोळा कोंबून अल्पवयीन मुलीवर दोन नराधमांनी अत्याचार केल्याची खळबळ जनक घटना तालुक्यातील धारावती तांडा येथे घडली. याप्रकरणी परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पीडित मुलगी १६ वर्षांची अल्पवयीन असून दोन जणांनी तिला गोड बोलून आपल्या घरी बोलावले.मुलगी घरात जाताच आरोपींनी घराचा दरवाजा आतून बंद केला. त्यानंतर एका नराधमाने पीडितेचे हात-पाय घट्ट बांधले व ती ओरडू नये म्हणून तिच्या तोंडात कापडाचा बोळा कोंबला. यानंतर दोन्ही नराधमांनी तिच्यावर क्रूरपणे लैंगिक अत्याचार केला. अत्याचारानंतर पीडितेची सुटका करताना नराधमांनी तिला जीवे मारण्याची धमकी दिली. हा प्रकार कोणाला सांगितल्यास तुला संपवून टाकू, असे म्हणत तिला दहशतीखाली ठेवले. धमकीमुळे प्रचंड घाबरलेल्या मुलीने कशीबशी आपली सुटका करून घर गाठले आणि घडलेला सर्व संतापजनक प्रकार आपल्या आई-वडिलांना सांगितला. पालकांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तात्काळ परळी ग्रामीण पोलीस ठाणे गाठत फिर्याद दिली. पोलिसांनी या घटनेची दखल घेत आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ६४, १२७(२),

▶▶ उर्वरित पान २ वर

## बीडमध्ये सिलेंडरचा काळाबाजार

### भल्यापहाटे कारवाईत साठेबाजी उघड ; २९ गॅस टाक्या जप्त

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात गॅस काळ्या बाजारावर नियंत्रण मिळवण्यासाठी पेठ बीड पोलिस स्टेशन हद्दीतील इमामपूर रोडवरील शिवनेरी नगर परिसरात १४ मार्च २०२६ रोजी सुमारे १.३० वाजता छापा टाकला असता २९ वेगवेगळ्या कंपनीच्या (इंडेन, भारत गॅस, एचपी) टाक्या आढळल्या. यापैकी १२ व्यावसायिक वापराच्या सिलेंडरांपैकी १ भरलेला आणि १७ घरगुती सिलेंडरांपैकी ८ भरलेले सिलेंडर जप्त करण्यात आले आहेत.

या कारवाईत पोलिसांनी तब्बल ७३ हजार ५५० रूपयांच्या सिलेंडर जप्त केले आहेत. बीड शहरातील इमामपूर रोडवरील शिवनेरी नगर भागात आज पहाटे दिड वाजण्याच्या सुमारास पोलिस आणि पुरवठा विभागाने संयु कारवाई केली. पेठ बीड पोलिस स्टेशनचे एपीआय नित्यानंद उबाळे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने (हेड कॉन्स्टेबल नितीन राठोड, पोलिस अंमलदार

▶▶ उर्वरित पान २ वर

**पोलिस आणि महसुल प्रशासनाने केलेल्या कारवाईत अजय मोहनराव घोडके (रा.शिवनेरी नगर, इमामपूर रोड, बीड) हा घरगुती व व्यावसायिक वापराचे गॅस सिलेंडर साठेबाजी करतांना आढळून आला. याप्रकरणी पुरवठा अधिकारी प्रशांत सुपेकर यांच्या फिर्यादीवरून अजय मोहनराव घोडके याच्याविरुध्द कलम २८७, २८८, बी.एन.एस. २०२३ सह कलम ३,७ अत्यावश्यक वस्तु अधिनियम १९५५ अन्वये पेठ बीड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी घोडकेला अटक केली आहे. सदरील कारवाई पोलिस अधिक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलिस अधिक्षक सचिन पांडकर, डीवायएसपी पूजा पवार, पो.नि.मारूती खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि. नित्यांनद उबाळे, पो.ह.नितीन राठोड, पो.शि.कल्याण जाधव, अंकुश राठोड, होमगार्ड पठाण यांनी केली.**

## गंगामसला उपकेंद्रातील डॉक्टर गैरहजर; वरिष्ठांकडून चौकशीची मागणी

**माजलगाव । प्रतिनिधी**

गंगामसला येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात कार्यरत असलेल्या डॉ. वाघमारे मॅडम या उपकेंद्राच्या निवासी ठिकाणी राहत नसल्याचा तसेच दिवसभर उपकेंद्रात हजर राहत नसल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे परिसरातील रुग्णांना वेळेवर वैद्यकीय सेवा मिळण्यात अडचणी निर्माण होत असल्याची तक्रार समोर येत आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, उपकेंद्रात डॉक्टर नियमितपणे उपस्थित नसल्याने



रुग्णांना उपचारासाठी इतर गावांमध्ये जावे लागत आहे. शासनाने ग्रामीण भागात आरोग्य सेवा

▶▶ उर्वरित पान २ वर

## ऊसाच्या फडात आढळला वृध्दाचा जळालेल्या अवस्थेतील मृतदेह

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई तालुक्यातील ममदापूर शिवारात पहाटे एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. शेतातीलऊसाला लागलेल्या आगीत ६० वर्षीय वृद्धाचा जळालेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला. विश्वनाथ पांचाळ (वय ६०) असे मृत व्यक्तीचे नाव असून, त्यांनी आजाराला कंटाळून स्वतःला जाळून घेत आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे. ममदापूर येथील



शेतकरी दिलीप मोतीराम देशमुख यांच्या गावालगत असलेल्या दोन एकर ऊसाला अचानक आग लागली. पहाटे साडेपाचच्या सुमारास त्यांच्या सालगड्याने ही माहिती दिली. जेव्हा आग विझवण्याचे प्रयत्न सुरू झाले, तेव्हा ऊसाच्या सरीमध्ये एका व्यक्तीचा मृतदेह पूर्णतः जळालेल्या अवस्थेत दिसून आला. घटनेची माहिती मिळताच अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा करत मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला. मृत विश्वनाथ पांचाळ हे उच्चशिक्षित (एम.ए.) होते आणि वारकरी संप्रदायाशी जोडलेले होते. मात्र, गेल्या काही काळापासून ते टीबी (क्षयरोग) या आजाराने ग्रस्त होते. या आजारामुळे ते मानसिक तणावात असल्याची चर्चा गावात आहे. आठ दिवसांपूर्वीही त्यांनी स्वतःवर ब्लेडने वार करून आत्महत्येचा प्रयत्न केला असल्याचे

▶▶ उर्वरित पान २ वर

## शासनाच्या सर्व योजना प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचल्या पाहिजेत : विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर

**बीड । प्रतिनिधी**

गावागावातील नागरिकांच्या समस्या त्वरित सोडविणे आणि शासनाच्या सर्व योजना थेट प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविणे हे प्रशासनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. महसूल विभागासह विविध शासकीय योजनांचा लाभ नागरिकांना त्यांच्या गावातच मिळावा यासाठी राज्य शासनाने 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर' मंडळ स्तरावर आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. या शिबिरांचा प्रभावी वापर करून गावातील सर्वसामान्यांच्या अडचणी सोडवाव्यात, असे आवाहन छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केले. बीड तालुक्यातील तळेगाव येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी

▶▶ उर्वरित पान २ वर

# नगरसेविका मनीषाताई गिराम यांच्या पाठपुराव्यामुळे मुख्याधिकाऱ्यांकडून प्रभागाची पाहणी

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील प्रभाग क्रमांक ८ मधील विविध भागांमध्ये रस्ते व नाल्यांची अवस्था अत्यंत बिकट झाल्याची बाब लक्षात घेऊन प्रभाग क्रमांक ८ च्या नगरसेविका सौ.मनीषाताई उल्हास गिराम यांनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्री. शैलेश फडसे यांचे लक्ष निवेदनाद्वारे वेधले होते. त्या निवेदनाच्या अनुषंगाने मुख्याधिकारी श्री. शैलेश फडसे यांनी शिवसेना



(उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या समवेत प्रभाग क्रमांक ८ मध्ये प्रत्यक्ष भेट देऊन परिसराची पाहणी केली. यावेळी ग्रामीण पोलीस स्टेशन, भाजी मंडई ते नेहरूनगर या परिसरातील नाल्यांची स्वच्छता करणे, तसेच पोलीस स्टेशनजवळील नाल्याशेजारी असलेल्या नगरपरिषदेच्या मालकीच्या कोंडवाडयाची जागेची स्वच्छता करण्याबाबत स्वच्छता निरीक्षक यांना तात्काळ आदेश देण्यात आले. सिटी पोलीस स्टेशन परिसरातील नागरिकांनी कचऱ्याची घंटागाडी वेळेवर येत नसल्याची तक्रार केली. यावर पुढील काळात घंटागाडी नियमित व वेळेवर येईल, अशी ग्वाही देण्यात आली. यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी प्रभाग क्रमांक ८ च्या विकासासाठी आपण वचनबद्ध असल्याचे सांगितले. तसेच नागरिकांनी त्यांच्या अडचणी व समस्या कधीही कळवाव्यात,असे आवाहन केले. मुख्याधिकारी श्री. शैलेश फडसे यांनी सांगितले की, प्रभाग क्रमांक ८ हा शहराच्या मध्यवस्तीत असलेला महत्त्वाचा व्यापारी परिसर असून येथील विविध विकास कामांकडे वैयक्तिक लक्ष देऊन ती पूर्णत्वास नेण्यात येतील. यावेळी शेषेराव तांबे,अशपाक मुन्ना भाई, जगताप सुनील , बाळासाहेब जाधव ,गोरे साहेब,नितीन राजपूत,सनी बुंदेले, नवनाथ प्रभाळे, सतीशसिंह परदेशी तसेच परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## थोडक्यात...

### राज्यात चार दिवस वादळी पाऊस आणि गारपिटीची शक्यता

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील काही भागांमध्ये १७ ते २० मार्च दरम्यान मेघगर्जनेसह पाऊस, विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यांची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. हा परिणाम प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, खानदेश आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांमध्ये जाणवू शकतो. १८ ते २० मार्च दरम्यान परिस्थिती अधिक तीव्र होण्याची शक्यता असून काही ठिकाणी गारपीट होण्याचीही शक्यता आहे.रब्बी हंगामातील पिकांची काढणी सुरू असल्याने शेतकऱ्यांनी काढलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवावीत. हवामानाच्या अद्ययावत अंदाजावर लक्ष ठेवून शेतीची कामे नियोजित करावीत आणि संभाव्य पाऊस व वादळी वाऱ्यांपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे कृषी विभागाकडून आवाहन करण्यात आले आहे.

### शिर्डीच्या साईबाबा संस्थानलाही गॅस टंचाईचा फटका, भाविकांना एकच लाडू प्रसादाचे पाकीट मिळणार

**शिर्डी । प्रतिनिधी**

साई संस्थानाने दिलेल्या माहितीनुसार, दिवसभरात सध्या ४५ हजार लाडू पाकीटांची विक्री होते, तर दर्शनार्थी रांगेत दररोज सुमारे ५० हजार बुंदी पाकीटांचे मोफत वितरण केले जाते. गॅस टंचाईमुळे लाडू बनविण्यासाठी लागणाऱ्या इंधनावर कट घालणे आवश्यक झाले आहे, त्यामुळे आर्थिक फटका संस्थानला बसणार आहे. सध्या संस्थानाकडे लाडू बनविण्यासाठी लागणारा गॅस दहा ते बारा दिवस पुरेल इतकाच शिल्लक आहे. त्यामुळे साई संस्थानाने गॅस बचतीसाठी प्रत्येक भक्ताला फक्त एक लाडू पाकीट देण्याचा निर्णय घेतला आहे. भक्तांना या निर्णयामुळे रोज फक्त एक लाडू पाकीट मिळणार आहे. गॅस वापरात काटकसर करण्यासाठी साई संस्थानने हा मोठा निर्णय घेतला आहे. गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर शिर्डीच्या साई संस्थानने प्रसादालयातील भोजन व्यवस्थेतही मोठा बदल करण्याचा निर्णय घेतला आहे.










◆ संपादकीय...

# नामांतराचे दिवस : प्रा. अरुण कांबळे

दिनांक १० एप्रिल १९७७ रोजी औरंगाबाद येथे दलित पँथरच्या अध्यक्षपदी माझी नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला. याचवेळी मराठवाडा विद्यापीठाचे नाव 'डॉ. आंबेडकर विद्यापीठ' असे ठेवण्यात यावे, असा ठरावही पहिल्यांदाच करण्यात आला. माझ्या पत्रकार परिषदेत हा आणि अन्य ठराव घोषितही करण्यात आले. मराठवाडा विद्यापीठ नामांतराचा प्रश्न अशा रीतीने सुरू झाला. भडकल गेट येथील जाहीर सभेत त्याची वाच्यता जाहीरपणे झाली. याच अधिवेशनातील एका सत्रात प्राचार्य मनोहर भि. चिटणीस व प्रा. गंगाधर पानतावणे यांची व्याख्यानेही झाली. दलित पँथरची आवश्यकता या दोघांनीही प्रतिपादिली व मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ' असे होणे योग्य आहे यासंबंधी समर्थ युक्तिवाद केले. नामांतर आंदोलनाच्या जन्मकाळचे हे दोन साक्षीदार!

वस्तुत: नामांतराचा प्रस्ताव हा इतर दहा प्रस्तावांपैकी एक होता. पण या प्रस्तावाला महत्त्व आले आणि महाराष्ट्राच्या व देशाच्या राजकारणातील, समाजकारणातील तो एक महत्त्वाचा प्रश्न बनला. दलित चळवळ गेली १६ वर्षे याच प्रश्नाला केंद्रबिंदू मानून चालू राहिली.

सांगली जिल्ह्यातील करगणी नावाच्या छोटयाशा खेड्यात जन्मलेला मी 'दलित पँथर' सारख्या महाराष्ट्रात आणि देशात आंबेडकरी आंदोलनाचे पर्व निर्माण करणार्या, दलित सेना, दलित महासभा, दलित कृती समिती, बहुजन समाज पार्टी आदी संघटनांना, पक्षांना देशभर जन्माला घालणार्या वादळाचा अधिनायक बनलो हे आश्चर्यच! त्यावेळी माझे वय होते अवघे तेवीस वर्षे.

आई-वडील शिक्षक. आंबेडकरी विचारांचं बाळकडू लाभलेलं. शिकायला म्हणून प्रारंभी सांगलीला आणि नंतर एम.ए. साठी म्हणून मुंबईला आलो. शिक्षण आणि चळवळ एकत्रित सुरू. समजलं तेव्हापासून गाणं, लिहिणं, वाचणं सुरू. तक्क्यात सर्वांना 'प्रबुद्ध भारत' वाचून दाखवण्याचं काम माझे वडील मला कौतुकानं सांगायचे. त्यातून माझा पिंड पोसला आणि दलित साहित्याची-दलित पँथरची चळवळ सुरू झाली. तेव्हा माझा सूर मला सापडला.

पुढे, राजा ढाले यांनी दलित पँथर बरखास्त करून मास मूव्हमेंट सुरू करण्याचा निर्णय घेतला. आम्हाला हा निर्णय मान्य झाला नाही. आम्ही दलित पँथरच चालू ठेवणार असे घोषित करून कामाला लागलो. त्यावेळचे माझे साथीदार होते रामदास आठवले, एस.एम.प्रधान, उमाकांत रणधीर, दयानंद म्हस्के, गंगाधर गाडे, प्रीतमकुमार शेगावकर, विठ्ठलराव साठे आदी. सगळ्यांनी मिळून अध्यक्षस्थानी माझी निवड केली. एस. एम. प्रधान उपाध्यक्ष, गाडे सरचिटणीस, आठवले संघटक, म्हस्के चिटणीस असे पदाधिकारी निवडले गेले आणि दलित पँथर पुनश्च उभी राहिली. नामांतर आंदोलनाने दलित पँथरच्या पुनर्निर्मितीला संजीवनी दिली. मराठवाडयात विद्यापीठ कार्यकारिणीने नामांतराचा प्रस्ताव एक मताने संमत केला. मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी आमच्या शिष्टमंडळाला सांगितले की, लोकांकडून ही मागणी येऊ द्या, आम्ही तिचा आदर करू. झाले! १२ ऑगस्टला दलित पँथरचा विराट मोर्चा घोषित झाला. मुंबईतील एका वृत्तपत्राने या मोर्चाचे वर्णन केले. 'मुंबई नगरीने असा मोर्चा आतापर्यंत पाहिला नव्हता (नवभारत टाइम्स).' सरकारचे धाबे दणाणले. मुख्यमंत्री मुंबईत नव्हते. गृहराज्यमंत्री शरद पवार होते. मोर्चाची लोकशक्ती अफाट होती. लोकांनी ओव्हल मैदान व्यापून टाकले. पोलिसांचे डोळे फिरले आणि मोर्चावर लाठीचार्ज करण्यात आला. स्त्रियांना, मुलांना, म्हातार्या-कोतार्यांना जीवघेणी मारहाण झाली. मीही मरता मरता वाचलो. अनिल गोंडाणे नावाच्या एका कार्यकर्त्याने पोलिस अधिकार्याला पायात पाय घालून पाडले. मी लाठीचार्जच्या तडाख्यातून सुटलो. पोलिसांच्या हल्ल्याचे पहिले लक्ष्य मी होतो.

या लाठीचार्जनंतर मात्र चळवळ अधिक धारदार बनली. लोक पेटून उठले. आम्ही महाराष्ट्रभर 'जेलभरो आंदोलन' सुरू केले. सुरुवात नांदेड येथून झाली. मी व एस.एम.प्रधान यांच्या नेतृत्वाखाली १०,००० स्त्री-पुरुष तुरुंगात गेलो. हाच प्रकार लातूर-उस्मानाबाद व इतर ठिकाणीही झाला. मी स्वत: जातीने सर्व ठिकाणी या आंदोलनाचे नेतृत्व केले व तुरुंगात भरती झालो. या आंदोलनाचे वैशिष्ट्य म्हणजे स्त्रिया फार मोठया प्रमाणात या आंदोलनात सहभागी झाल्या होत्या. या आंदोलनाचा परिणाम म्हणून २७ जुलै १९७८ रोजी मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याचा निर्णय नवनिर्वाचित मुख्यमंत्री शरद पवार यांनी घोषित केला.विधीमंडळात ठराव एकमताने संमत होण्याच्या आदल्या दिवशी कौन्सिल हॉलमध्ये मुख्यमंत्र्यांनी सगळ्या आमदारांची बैठक बोलावली होती. या बैठकीला मला विशेष निमंत्रित म्हणून बोलावले होते. मराठवाडयातील आमदार नामांतरला पाठिंबा देण्याच्या मन:स्थितीत नव्हते. प्रसंग बाका होता. आता काय होणार? मी मुख्यमंत्र्यांची परवानगी घेऊन बोलायला उभा राहिलो. '' डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि मराठवाडा यांचं अतूट नातं आहे. बाबासाहेब दलितांचे नेते तर मराठवाडा हा कमालीचा दलित



प्रदेश! आंबेडकरांनी या भागात पहिल्यांदा शिक्षण नेले. औरंगाबाद महाराष्ट्राची राजधानी करण्याची मागणी केली. निजामाचे संस्थान खालसा करण्यात पुढाकार घेतला. मराठवाड्याची अस्मिता आणि बाबासाहेबांचे नाव यांचे रक्तामांसाचे नाते आहे आणि म्हणून या विद्यापीठाचे नाव 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असे व्हावे. मराठवाडा हा शब्द काढावयाचा नाही. तो तिथे हवाच. हा 'दुग्धशर्करा' योग आहे. माझे सहकारी गाडे यांनी माझ्या भाषणाला पाठिंबा दिला. विधान परिषदेचे तत्कालीन सभापती रा. सु. गवई यांनी या प्रस्तावाचे जोरदार समर्थन केले आणि त्यानंतर मराठवाडयातील आमदारांची मने बदलली. मुख्यमंत्री खूश झाले. त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकिर्दीतील हा पहिलाच निर्णय होता. त्यांनी मनापासून घेतलेला. या निर्णयाची यशस्विता ही त्यांच्या कारकिर्दीची यशस्विता होती. जर 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असे नामांतर व्हावे असा प्रस्ताव मांडला नसता तर मराठवाड्यातील आमदारांनी नामांतर प्रस्तावाला पाठिंबा दिला नसता. ती काळ्या दगडावरची रेघ होती. आम्ही यशस्वी झालो. मराठवाड्यातील आमदार तयार झाले. प्रस्ताव संमत झाला. प्रस्ताव संमत झाला त्यावेळी आम्ही सभागृहाबाहेर होतो. बाबासाहेबांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून आनंदोत्सव साजरा करीत होतो.

त्याचवेळी मराठवाड्यातून बातमी आली. नामांतर विरोधकांनी प्रतिआंदोलन सुरू केले आहे. आंदोलनाचे स्वरूप तीव्र होऊ लागले. रेल्वेचे रूळ उद्ध्वस्त झाले. सरकारी कार्यालयांची नासधूस झाली. सगळयात भयंकर म्हणजे दलितांच्या संसारांची राख-रांगोळी झाली. मराठवाड्यापायी जिल्ह्यांत सैतानाचा हैदोस सुरू झाला. खून-खराबा झाला. लढतालढता पोचीराम कांबळे व जनार्दन मेवाडे हे भीमवीर धारातीर्थी पतन पावले. त्यांच्या लढाईच्या रोमहर्षक कथा आजही डोळयात पाणी उभे करतात. सगळयात अधिक नुकसान नांदेड आणि उस्मानाबाद जिल्ह्यांत झाले. आंदोलकांनी कायदा हातात घेतला. बाबांचे फोटो फोडले, मुलांची पुस्तके फाडली. तांब्या पितळेची भांडी चेचली. मनुस्मृतीचे अधिराज्य सुरू झाले. 'मराठवाडा' पत्राने या काळात आगीत तेल ओतण्याचे कार्य केले.

या सगळया काळात आम्ही जीवाचे रान करून आपद्ग्रस्तांना मदत करीत होतो. पत्थराला पाझर फोडणारी दृश्ये होती. घरटी उद्ध्वस्त झाली. सगळे 'फुकून' टाकले. पण सर्वसामान्य जनतेने नामांतराची मागणी सोडली नाही. जिवाच्या निकराने ते म्हणत होते, 'आमच्या जिवाची-संसाराची राखरांगोळी झाली तरी चालेल, पण नामांतराचा निर्णय बदलू नका.' ही जिद्द केवळ अतुलनीय अशीच होती.

सरकारी मदत चालू झाली. समतावादी पक्ष, संघटना, व्यक्ती फिरू लागल्या. नामांतर आंदोलनाचे स्वरूप या जळितानंतर व्यापक झाले. ते समतेचे आंदोलन झाले. याच काळातील एक अनुभव सांगण्यासारखा आहे. मी सर्वत्र आपद्ग्रस्तांना भेटी देत होतो. असाच उदगीरला गेलो असताना नळदुर्ग या गावच्या भयंकर हल्ल्याची वार्ता ऐकून तेथे जाण्यासाठी तयार झालो. नळदुर्गचे विनायक बलाडे यांचे घर सुरूंग लावून पाडण्यात आले होते. मी जायला निघालो आणि माझ्या गाडीपुढे एक माऊली आडवी पडली. उठायला तयार नाही. 'मी अरुणभाऊंना नवदुर्गला जाऊ देणार नाही. त्यांच्या जीवाला धोका आहे.' मी निर्धारपूर्वक सांगितले, 'आपल्या मंडळीचे संसार उद्ध्वस्त होत असताना, त्यांचे खून पडत असताना मी गप्प बसू शकणार नाही. मला तिथे जाऊन जातीयवाद्यांचा बंदोबस्त करणे भाग आहे. आपल्या मंडळींचे सांत्वन करणे आवश्यक आहे.' माऊली हटेना. ती म्हणाली, 'आपण लाखांचे पोशिंदे आहात. मी आपल्याला जाऊ देणार नाही. तुम्हाला ते ठार मारतील. आपण जाऊ नका.'

माऊली ऐकायला तयार नाही. मी माघार घेतली. पोलिस स्टेशनला गेलो. नळदुर्गचा वृत्तांत मागवला.पोलिस अधिका-याने सांगितले, नळदुर्गच्या आंदोलकांनी तुम्ही जाण्याच्या मार्गावर दगडांनी भरलेल्या बैलगाडया उभ्या केल्या आहेत. तुम्ही जाताच, तुमच्यावर वर्षाव करण्याचा त्यांचा बेत होता. माझ्या डोळयांपुढे कृष्णवर्णियांचे चित्र उभे राहिले. 'लिंचिंग'. दगडाने ठेचून मारण्याची घोर शिक्षा! माझा बळी याप्रसंगी जाता तर त्या अज्ञात माऊलीने माझे प्राण वाचवले. असे प्रेम! मराठवाड्यातील भीषण अत्याचारानंतर मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलनाचे स्वरूप बदलले. ते समतेचे लोकशाहीचे प्रतीक बनले. समतावादी दलितेतर त्यात मोठया प्रमाणात सामील झाले. प्रा. म. भि. चिटणीस, डॉ. बाबा आढाव, कॉ. शरद पाटील, अंकुश भालेकर, बाबा दळवी, बापूराव जगताप आदींनी या आंदोलनात सहभागी होऊन आंदोलनाची कक्षा व्यापक केली. मराठवाडयापुरती 'मराठवाडा विद्यापीठ नामांतर विद्यार्थी-नागरिक कृती समिती' याअगोदरच स्थापन झाली होती. ज्येष्ठ आंबेडकरवादी प्राचार्य म. भि. चिटणीस या समितीचे अध्यक्ष होते. त्यांचे नेतृत्व लाभल्यामुळे या समितीला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. एस. एम. जोशी, कॉ. चंद्रगुप्त चौधरी, बाबा दळवी, अहिल्या रांगणेकर आदी समाजवादी, साम्यवादी व डाव्या चळवळीतील नेत्यांनीही आता जनप्रबोधनाला सुरूवात केली होती. नामांतर आंदोलनात मराठवाडयातील दलितांच्या घरा-दारांची राख झाली, पण फिनिक्स पक्ष्याप्रमाणे नवी समतावादी विचारांची पिढी उभी राहिली व समतेचे आंदोलन कितीतरी पुढे गेले. अंकुश भालेकर, बापूराव जगताप, फ. मुं. शिंदे, बा. ह. कल्याणकर, जवाहर राठोड आदी समतावादी तरूणांची नवी फौज लढण्यासाठी सिद्ध झाली. आणि मग आम्ही सर्वांनी मिळून ६ डिसेंबर १९७९ ला मराठवाडा विद्यापीठ नामांतर सत्याग्रह जाहीर केला. दलित पँथर, मराठवाडा विद्यापीठ नामांतर विद्यार्थी नागरिक कृती समिती, इतर संघटना यांनी सत्याग्रहाची हाक दिली आणि अक्षरश: लाखो लोक औरंगाबादला सत्याग्रहासाठी एकत्र आले. येत असताना लाखोंना वाटेत अटक झाली. औरंगाबाद शहराला युद्धछावणीचे स्वरूप प्राप्त झाले. अटक सत्र जोरात सुरू होते. मी वेषांतर करून औरंगाबाद शहरात पोहोचलो आणि आंदोलनाचे नेतृत्व केले. भडकल गेट आणि क्रांती चौक माणसांनी फुलून गेला होता. आम्हाला अटक करून 'हर्सूल जेल' मध्ये आणले. जेलचे स्वरूप पालटून गेले. मी तुरूंगाच्या बाहेर येऊन पत्रकारपरिषद घेतली आणि परत तुरुंगात सामील झालो. स्वातंत्र्योत्तर काळातील समतेच्या आंदोलनातील ६ डिसेंबर ७९ चा नामांतर सत्याग्रह हे तेजस्वी पर्व आहे. संपूर्ण महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर लाखो कार्यकर्ते या आंदोलनात सामील होऊन ठिकठिकाणी तुरूंगात गेले. सगळे समतावादी, भटके-विमुक्त, सर्व जाती-जमातींतील दलित, जातीच्या-धर्माच्या-पक्षाच्या भिंती भेदून या आंदोलनात सामील झाले. नामांतर आंदोलनाने समतेच्या चळवळीत अपूर्व इतिहास निर्माण केला. न भूतो असा ! या चळवळीचे नेतृत्व करण्याचे भाग्य मला लाभले याबद्दल मी स्वत:ला धन्य समजतो. वस्तुत: नामांतर आंदोलनात सहभागी झालेल्या लाखो कार्यकर्त्यांना, ज्यांची घरेदारे जळाली त्या दलित बन्धुभगिनींना, जे धारातीर्थी पतन पावले त्या भीमवीरांना ते श्रेय जाते. मी केवळ नेतृत्वाचा निमित्तमात्र धनी झालो. या सत्याग्रहासाठी लाखो वाटांनी येत असताना माझे सहकारी मित्र बाबा आढाव, मोहन धारिया, जोगेन्द्र कवाडे रामदास आठवले, हुसेन दलवाई यांना वाटेत अटक झाली आणि वेगवेगळया तुरूंगात भरती केले गेले. समुद्राला उधाण आले. दु:खाची बाब म्हणजे या सत्याग्रहात रा. सु. गवई, बॅ. खोब्रागडे, प्रकाश आंबेडकर, राजा ढाले, नामदेव ढसाळ आदी दलित नेते सहभागी झाले नाहीत याचे शल्य कायम राहिले. नामांतराच्या प्रश्नावर संपूर्ण महाराष्ट्रात हजारो मोर्चे निघाले. मुंबईत मंत्रालयावर निघालेले काही मोर्चे फारच प्रचंड होते. सत्याग्रह, जेलभरो आंदोलन, रास्ता रोको आंदोलन, उपोषणे हे मार्ग लोक सर्वत्र अवलंबित होते. या आंदोलनाचे नेतृत्व अर्थातच दलित पँथरकडे होते. आमची जबाबदारी वाढली होती. रात्रंदिवस सभा, संमेलने, मेळावे, परिषदा असे कार्यक्रम होत होते. महाराष्ट्रात विशेषत: मराठवाडयात कार्यक्रमाची गर्दी असे. कार्यकर्ते अतिउत्साहात कार्यक्रम ठेवीत. अनेकदा न विचारता, निश्चिती न करता कार्यक्रम ठेवले जात व नंतर गळझटीला येत. काहीही करा पण कार्यक्रमाला चला. आमच्या इज्जतीचा प्रश्न आहे, लोकांसमोर जाता येणार नाही, वर्गणी गोळा केलेली आहे वगैरे. आमची ख्याती वेगळीच असे. दौर्यावर जाण्यासाठी पैसे नसत, ऐनवेळी कसेतरी पैसे गोळा करून जावे लागे. चालत्या गाडीत चढावे लागे. आरक्षण नसल्यामुळे रात्ररात्र जागरण करावे लागे. उभे राहून प्रवास करावा लागे. लागोपाठ जागरण व प्रवास यामुळे प्रकृतीवर परिणाम होई. कार्यक्रमांवरही त्याचा परिणाम होत असे. कार्यक्रमांना मात्र लोकांची तुफान गर्दी होई. लोक आमची तासन् तास वाट पाहत असत. कार्यक्रमांना हारांचे ढीग पडत असत. पण पोटात अन्न नसल्यामुळे भाषणाच्या वेळी बोलणे अवघड जाई. आवाजही बसलेला असे. कार्यकर्त्यांचाही यात काही दोष नसे. ते कार्यक्रमाच्या तयारीसाठी त्रास घेत. नंतर आमची वाट पाहात. सगळया गाडया धुंडाळत बसत. आम्ही डब्यातून धडपडत उठत बाहेर आलो की, कार्यकर्ते घोषणा देत आमची मिरवणूक काढत. आधीच कार्यक्रमाला वेळ झालेला असल्यामुळे जेवणखाण करण्याचा प्रश्नच नसे. रात्री सभा उशिरा संपे. मग दोन-तीन वाजता डुलक्या घेत घेत जेवण होई. नंतर कार्यकर्त्यांशी चर्चा, झोप किंवा लगेच पुढच्या गावचा कार्यक्रम. कधीकधी विनातिकिट सुद्धा प्रवास करणे भाग पडे. या सगळया चक्रातून जात असताना मला माझी प्राध्यापकाची नोकरीही सांभाळावी लागत असे, कारण ती माझी हक्काची भाकरी आणि स्वाभिमानाची चाकरी होती. इतरांची गत तर आणखीनच वाईट होती.

या सगळयाचा परिणाम म्हणून मी आजारी पडलो, क्षयाची बाधा झाली काय असे वाटण्याइतपत प्रकृती बिघडली. इंजेक्शनचा कोर्स घेतला आणि पुन्हा कामाला लागलो. उसंत घ्यायला वेळ नव्हता. त्यातच मुख्यमंत्र्याच्या बैठकी, अत्याचारग्रस्तांची गार्हाणी, मदतीसाठी अर्ज वगैरे. नेतृत्वाचा मुकूट डोक्यावर होता. काटे बाकीच्यांना दिसत नव्हते. अनेकदा प्रश्न पडे, आपण राजा आहोत की पोतराजा! पण सभा, संमेलने गर्दी यांच्या धुमश्चक्रीत एवढा विचार करायला वेळ कुठला? लोकांचे प्रेम तर अपरंपार. ओवाळण्यासाठी आया-बहिणींच्या रांगा. आम्हाला अमान्य असले तरी सहन करावे लागे. चहा प्यायला जाणे हा एक कार्यक्रमच असे. सगळयांच्या घरी जावे लागे. मी तर चहाही न पिणारा. त्यामुळे मला नुसतेच जाऊन बसावे लागे. परंतु लोकेच्छेचा आदर करावा लागे. त्यांचे प्रेम तर असे की, त्यांच्या कथांचा संग्रहच करावा लागेल. जगातील फार थोडया नेत्यांच्या वाट्याला असे प्रेम आले असेल. माझ्या अठरा विश्व दरिद्री समाजाने असे प्रेम मला-आम्हाला दिले की, त्याची उतराई कधीही करता येणार नाही. प्रेमाची नशा आम्हालाही चढत असे. त्याचमुळे असेल, मी मान कधीही खाली झुकवली नाही. बाणा ताठ राहिला. मोडलो पण वाकलो नाही. नामांतराच्या प्रश्नावर कोणतीही तडजोड स्वीकारली नाही. दिल्लीहून पंतप्रधानांपासून निरोप आले. पण आमिषाला बळी पडलो नाही. हा स्वाभिमान कोठून आला? ही सूर्यशक्ती कोठून मिळाली, याचा आज विचार करतो तेव्हा समजते, हे बळ बाबासाहेबांच्या विचारांपासून, त्यांच्या व्यक्तिमत्वापासून मिळाले आणि त्याला पीळ बसला तो माझ्या अर्धपोटी, नागडया- उघडया बांधवांच्या प्रेमाचा. त्यांची ही निष्ठा, प्रेम, भाबडेपणा आमच्यातील प्रामाणिकपणाला कारणीभूत ठरले. भ्रष्टाचार जाळून टाकण्याचे सामर्थ्य त्यात होते. त्यामुळे आम्ही अधिकच प्रदीप्त झालो.

मराठवाड्यातील हिंसाचारानंतर पंतप्रधान व सर्वपक्षीय नेत्यांना यासंबंधीची माहिती देण्यासाठी मी स्वत: दिल्लीला गेलो. तत्कालीन पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्या भेटीचा सविस्तर वृत्तांत मी अन्यत्र कथन केला आहे. तो गंमतीदार आहे. श्रीमती इंदिरा गांधी त्यावेळी विरोधी पक्षनेत्या होत्या. त्यांनी आमची चांगली विचारपूस केली. आगतस्वागत केले व मराठवाड्याचा दौरा करण्याची इच्छाही व्यक्त केली. बाबू जगजीवनराम हे त्यावेळचे पंतप्रधानकी गमावलेले दलित नेते. बाबूजींनी त्यावेळी असे उद्गार काढले, 'आप लढो, हम सत्तामें रहेंगे'. यशवंतरावांचा अनुभव फारच वेगळा आला. मी दिल्लीत गेलो की यशवंतरावांना अवश्य भेटत असे. यशवंतरावांनी नेहमीच्या पद्धतीने माझे स्वागत केले. साहित्यिक घडामोडींसंबंधी चर्चाही केली. मराठवाड्यातील हिंसाचाराबद्दल बोलणे सुरू झाले तेव्हा अत्याचारग्रस्तांच्या मुलाखती असलेली ध्वनिफित मी त्यांना ऐकवली. दलितांच्या मदतीला धावून जाणार्या नांदेडच्या महाजन पाटलाची हकीकत ऐकून यशवंतराव भारावले. त्यांच्या डोळयातून अश्रूधारा वाहिल्या. माझा हात धरून ते म्हणाले, 'आमचीही स्थिती महाजन पाटलांसारखी आहे. मराठवाड्यातील लोक माझेही ऐकण्याच्या मन:स्थितीत नाहीत.' यशवंतरावांचे ते पाणावलेले डोळे आजही माझ्या डोळयांसमोर दिसताहेत.

एक प्रसंग आठवतो. नामांतराच्या आंदोलनाला प्रतिसाद म्हणून मुख्यमंत्र्यांनी नागपूरला एक बैठक बोलावली. बैठकीला दोन्ही बाजूंचे प्रतिनिधी उपस्थित राहिले. मी बोलायला उभा राहिलो. मुख्यमंत्र्यांचे म्हणणे होते, आम्हाला थोडा वेळ द्या. नामांतर करतो. आम्ही वेळ द्यायला तयार नव्हतो. लोकशाही प्रथेप्रमाणे ठरावाची अंमलबजावणी आताच करा, अन्यथा ती होणार नाही अशी भूमिका आम्ही घेतली होती. स्वत: अण्णा-एस.एम. जोशी मला म्हणाले, 'अरुण, शरदला थोडा वेळ देऊ, त्याच्या मनात नामांतराचे आहे.' मी बधलो नाही. अखेर मुख्यमंत्री शरद पवारांनी मला स्वत: चिठ्ठी पाठवली. त्यावर त्यांनी आपल्या हस्ताक्षरात लिहिले होते... अमुकअमुक तारखेपर्यंत नामांतर करतो. तोपर्यंत आंदोलन करू नका. मला वेळ द्या.

महाराष्ट्राचा मुख्यमंत्री मला, फाटक्या माणसाला हस्ताक्षरात पत्र लिहून वेळ द्या, असे म्हणतो हे सामर्थ्य आंदोलनातून निर्माण झाले. (मुख्यमंत्र्यांनी पत्रात दिलेल्या तारखेच्या तीन दिवस अगोदर त्यांचे सरकार बरखास्त झाले व नामांतराचे भिजत घोंगडे तसेच राहिले हे अलाहिदा!)

अशा आंदोलनाचा मला अभिमान वाटतो हीच माझी कमाई! हीच दौलत! यापुढे कोणत्याही पदाची मला कधीच किंमत वाटली नाही. पुढेही वाटणार नाही.

– प्रा. अरुण कांबळे

◆ पान १ वरून पुढे...

## अल्पवयीन मुलीला....

३५१(२), ३५२, ३(५) आणि बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम (पोक्सो) २०१२ च्या कलम ४ आणि १७ नुसार गुन्हा रजिस्टर नंबर १२५/२०२६ दाखल केला आहे. सध्या दोन्ही आरोपी फरार असून या प्रकरणाचा सखोल तपास अंबाजोगाई उपविभागाचे पिंक पथक आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जाधव करत आहेत.

## बीडमध्ये सिलेंडरचा ...

कल्याण जाधव, अंकुश राठोड, होमगार्ड पठाण) ही कारवाई केली. पुरवठा अधिकारी शिवकुमार स्वामी व तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार प्रशांत सुपेकर, कारकून श्रीराम वायभट व संतोष मुळीक उपस्थित होते. प्राथमिक तपासात सिलेंडर अनधिकृतपणे भरले गेले असल्याचे निदर्शनास आले असून, लाखो रुपयांचे व्यवहार होत असल्याचा संशय आहे. पेठ बीड पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ७८/२०२६ नोंदवला असून, भारतीय न्याय संहिता कलम २८७, २८८ व अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ चे कलम ३ व ७ अंतर्गत तपास सुरू आहे. पुढील तपास पीएसआय बारगळ करीत आहेत. मागील महिन्यांत जिल्ह्यात घरगुती सिलेंडर व्यावसायिक वापरासाठी व उलट वापर होत असल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या, ज्यामुळे स्फोटाचा धोका व ग्राहकांना जास्त किंमत भरावी लागत होती. ही कारवाई अशा अवैध क्रियाकलापांवर अंकुश ठेवेल. पुरवठा विभागाने भविष्यातही अशा मोहिमा सुरू राहतील असे सांगितले असून, नागरिकांनी माहिती द्यावी असे आवाहन केले आहे. स्थानिक व्यापारी व रहिवाशी समाधान व्यक्त करीत असून, सुरक्षित वापरासाठी कायद्याचे पालन करावे असे तालुका पुरवठा अधिकारी प्रशांत सुपेकर यांनी सांगितले.

## गंगामसला उपकेंद्रातील....

सक्षम करण्यासाठी उपकेंद्रे सुरू केली असताना, संबंधित अधिकारीच गैरहजर राहत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. या प्रकरणाची वरिष्ठ आरोग्य अधिकाऱ्यांनी तातडीने चौकशी करून संबंधितांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांसह संतोष रासवे यांनी केली आहे. तसेच उपकेंद्रात डॉक्टर नियमितपणे उपस्थित राहून नागरिकांना योग्य वैद्यकीय सेवा द्यावी, अशीही अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, या प्रकरणाकडे आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी लक्ष देणार का आणि दोषींवर कारवाई होणार का, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## ऊसाच्या फडात...

प्राथमिक तपासात समोर आले आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले, सून आणि एक विवाहित मुलगी असा परिवार आहे. शेतकरी दिलीप देशमुख यांनी या घटनेवर संताप व्यक्त केला आहे. शेजारील शेतकरी सुरेश बुरगे यांनी शेत रस्ता अडवल्यामुळे त्यांचा ऊस कारखान्याला जाऊ शकला नाही. रस्ता मोकळा करण्यासाठी तहसीलदारांकडे अर्ज देऊनही प्रशासनाने वेळेत कारवाई केली नाही. रस्ता मिळाला असता तर ऊस आधीच तुटला असता आणि ही दुर्दैवी घटना घडली नसती, असे देशमुख यांनी म्हटले आहेमृतदेह शवविच्छेदनासाठी अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. आजाराला कंटाळून त्यांनी स्वतःला पेटवून घेतले असावे असा प्राथमिक अंदाज आहे, मात्र मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवाल आणि पोलीस तपासानंतरच स्पष्ट होईल, अशी माहिती अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांनी दिली आहे.

## शासनाच्या सर्व....

अधिकारी जतीन रहेमान, अप्पर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. विभागीय आयुक्त पापळकर पुढे म्हणाले की, सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी वारंवार तहसील किंवा जिल्हाधिकारी कार्यालयात येण्याची गरज भासू नये, यासाठीच मंडळ स्तरावर शिबिरे घेण्याची संकल्पना राबविण्यात येत आहे. या शिबिरांच्या माध्यमातून महसूल विभागाशी संबंधित विविध प्रश्नांसह शासनाच्या समाजोपयोगी योजनांची माहिती व लाभ नागरिकांना दिले जाणार आहेत.

◆ पान ४ वरून पुढे...

## सुरत चेन्नई ग्रीनफिल्ड...

याचा देखील विचार होणार असून शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्याविषयी सरकार सकारात्मक असल्याचे सांगितले यावेळी राष्ट्रीय ग्रीनफिल्ड महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी या प्रकल्पासाठी जमिनीचा प्रत्यक्ष ताबा घेतला नसला तरीही शेतकऱ्यांना आतापर्यंतचे व्याज देण्याचा प्राधिकरणाचा विचार असल्याचे सांगितले आष्टी तालुक्यातील नांदूर, बाळेवाडी, कुंबेफळ, खुंटेफळ, पुंडी, शिरापूर, निमगाव चोभा,धिर्डी, केळसांगवी, खानापूर चिखली वाळुंज पारगाव जोगेश्वरी या गावातील शेतकऱ्यांनी आपापली निवेदने सादर केली असून त्यावर सारासार विचार करून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मोबदला घेण्याबाबत आपण जिल्हाधिकारी बीड यांचे पासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत चर्चा करून असे आश्वासन आ. सुरेश धस यांनी या गावातील शेतकऱ्यांना यावेळी दिले

## सराफांची जिल्हास्तरीय....

करणार नाहीत तर सदर प्रकरणात सखोल माहिती घेऊन त्यांच्यावर कारवाई केली जाईल. पोलिस आणि जनता हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत जनतेने पोलिसांना मदत करावी पोलीस ही त्यांना मदत करण्यास तत्पर आहेत असे आवाहन त्यांनी केले. तसेच शिवाजी बंटेवाड यांनी देखील उपस्थित सुवर्णकार बांधवांना मार्गदर्शन करताना कायद्याचे पालन केल्यास व्यापाऱ्यांना कोणतीही अडचण येणार नाही, असे सांगितले. सुवर्णकारांनी सीसीटीव्ही कॅमेरे, व्यवहारांची नोंदवही व ग्राहकांच्या ओळखपत्राची तपासणी यांसारख्या सुरक्षा उपाययोजना वाढवाव्यात, असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमात सराफ सुवर्णकार असोसिएशनच्या वतीने नवनीत काँवत, शिवाजी बंटेवाड यांचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मोहनराव जगताप,तर प्रमुख पाहुणे म्हणून राजेश रोकडे, बाबुराव पोटभरे, गणेश बेंद्रे, वैभव शहाणे, माधव निर्मळ, मंगेश लोळगे, अनंत रुद्रवार, प्रभाकर कुलथे, पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष तुकाराम बापू येवले तालुकाध्यक्ष उमेश मोगरेकर, तालुकाध्यक्ष पांडुरंग उगले, या. समाज कल्याण सभापती कल्याण आबुज, आयपीएस अधिकारी राहुल कुमार तसेच पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ आदी मान्यवर उपस्थित होते. या मेळाव्यास माजलगाव परिसरातील सुवर्णकार व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या माध्यमातून व्यापाऱ्यांना कायदेशीर बाबींची माहिती मिळाल्याने भविष्यातही अशा मार्गदर्शक मेळाव्यांचे आयोजन करावे, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. अध्यक्षीय समारोप करताना मोहनराव जगताप यांनी सराफ व्यापाऱ्यांनी आपला व्यवसाय करीत असताना डोळ्यात तेल घालून अत्यंत सावध राहून हा व्यवसाय करावा आणि आधुनिक तंत्राचा वापर करावा असे आवाहन यावेळी केले. प्रास्ताविक सराफ सुवर्णकार असोसिएशनचे माजलगाव तालुका अध्यक्ष रामराजे रांजवण, यांनी केले. शिवाजी बंटेवाड, गजानन बोकन यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नारायण झोडगे गोविंद गोचडे यांनी केले तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सराफा सुवर्णकार असोसिएशन सर्व सभासदांनी परिश्रम घेतले.

## गडकोट विकास महामंडळ...

आश्वासन मिळाल्यानंतर उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला. आंदोलनकर्त्यांनी सांगितले की, गडकोट विकास महामंडळ स्थापन करण्याच्या मागणीवर शासनाने लवकर निर्णय घ्यावा, अन्यथा पुढील आंदोलनाची दिशा ठरवली जाईल. गडकिल्ले हे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याच्या इतिहासाची जिवंत साक्ष असल्याने त्यांचे संवर्धन करणे ही राज्याची जबाबदारी असल्याचे आंदोलनकर्त्यांनी यावेळी नमूद केले.

## पत्रकार संघ आणि...

करून खऱ्या अर्थाने सामाजिक सलोखा जपण्याचे काम आयोजकांनी केले अशा भावना या कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी व्यक्त करत या उपक्रमाचे कौतुक केले.अशा कार्यक्रमांमुळे समाजात एकोपा वाढण्यास मदत होते, असे मत आलेल्या सर्व मान्यवरांनी व्यक्त केले. इफ्तारच्या वेळी सर्व उपस्थितांनी एकत्र येत रोजा सोडला आणि एकमेकांना रमजानच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रामुख्याने ज्येष्ठ संपादक गंमत भंडारी, पत्रकार संघाचे मा. प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे,मंत्रालयातील ओएसडी प्रा. हमराज ऊईके, जफर खान साहब, हाफिज जमील साहब, सय्यद जबीउल्हाह साहब, उमर खान , सय्यद कौशिक, इमरान जहागीरदार,स्वातंत्र्य सैनिक आणि रेल्वे आंदोलन कृती समितीचे अध्यक्ष जवाहरलाल सारडा, ज्येष्ठ समाजसेवक गोविंद सेठ कासट, ज्येष्ठ संपादक गुलदाद पठाण, सेवानिवृत्त शाखा अभियंता शेख अकबर, ज्येष्ठ पत्रकार रईस खान,प्रा. जावेद पाशा सर, पत्रकार अदनान खान, जिव्हाळा बेघर केंद्राचे अभिजीत वैद्य, राजू वंजारे यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने उस्फूर्तपणे सहभागी झाली होती. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी आणि पदाधिकारी तसेच लाईफस्टाईल जिमचे संस्थापक बॉडी बिल्डिंगचे नॅशनल जज, इंटरनॅशनल कोच डॉ.सय्यद अरशियानउल्लाह मिसबाहउल्लाह सर, एक्झिक्यूटिव्ह फाउंडर डायरेक्टर महाराष्ट्र बॉडी बिल्डिंग असोसिएशन मुंबई तसेच इंजि. सय्यद अमानउल्लाह सचिव बॉडी बिल्डिंग असोसिएशन मुंबई यांनी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रम शांत, आनंददायी आणि उत्साही वातावरणात पार पडला. शेवटी सर्व उपस्थितांचे आभार मानण्यात आले.

◆ पान ४ वरून पुढे...

## छत्रपती शिवाजी महाराज....

महसूल मंडळातील १२ गावचे सरपंच , उपसरपंच , पोलीस पाटील , ग्रामपंचायत सदस्य , माजी जिल्हा परिषद सदस्य , माजी पंचायत समिती सदस्य तसेच महिला बचत गट , शेतकरी गट , विद्यार्थी आणि शेतकरी बांधव मोठ्या संख्येने या शिबिरात सहभागी झाले . नागरिकांच्या मोठ्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला लोकाभिमुख स्वरूप प्राप्त झाले. या शिबिराच्या माध्यमातून विविध विभागांचे माहितीपर स्टॉल्स उभारण्यात आले होते . महसूल विभागाशी संबंधित जमीन नोंदणी , खातेफोड , वारस नोंद , सातबारा उतारे , विविध दाखले व प्रमाणपत्रे तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांना देण्यात आली . नागरिकांनी आपल्या अडचणी मांडल्या आणि संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांना आवश्यक मार्गदर्शन केले. शिबिरामध्ये महसूल विभागाच्या विविध सेवांचा प्रत्यक्ष लाभ नागरिकांना देण्यात आला . यामध्ये जिवंत सातबारा ( मयत खातेदार कमी करणे ) , डिजिटल सातबारा वाटप , वारस फेरफार , वर्ग – १ ते वर्ग – २ रूपांतर , ई – पिक पाहणी , ग्रीस्टॅक नोंदणी , ई – वसुली पावती , सेवामित्र प्रमाणपत्र , प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र , पानंद रस्ते योजना , रस्त्यांच्या नोंदी सातबारा उताऱ्यावर घेणे , ई – केवायसी प्रक्रिया , आधार कॅम्प , ई – शिधापत्रिका वाटप , लक्ष्मी मुक्ती योजना लाभ , रक्तदान शिबिर , अभिलेख दुरुस्ती , मोफत आरोग्य तपासणी , घरकुल मंजुरी आदेश , गायरान मंजुरी आदेश तसेच मागेल त्याला शेततळे योजना याबाबत नागरिकांना सविस्तर माहिती देण्यात आली . या शिबिरामध्ये मोठ्या प्रमाणावर विविध सेवा नागरिकांना देण्यात आल्या.

## जय महेश साखर...


लवकरच शेतकऱ्यांचे थकीत पैसे देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले जात आहे. मात्र प्रत्यक्षात पैसे मिळेपर्यंत शेतकरी समाधानी नसल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. त्यामुळे प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन शेतकऱ्यांचा प्रश्न सोडवावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# कर्जदाराने हप्ते थकवले तर जामीनदारावरही कारवाई; वसुलीच्या वेळी गैरवर्तन केल्यास कायदेशीर कारवाई

कर्ज व्यवहारांबाबत महत्त्वाचा निर्णय देताना Supreme Court of India ने स्पष्ट केले आहे की कर्जदाराने कर्जाचे हप्ते थकवले तर बँक किंवा पतसंस्था कर्जदारासोबतच जामीनदाराकडूनही थेट वसुलीची कारवाई करू शकतात. त्यामुळे जामीनदाराची भूमिका केवळ औपचारिक नसून ती कायदेशीरदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले आहे. कर्ज घेताना अनेक वेळा मित्र, नातेवाईक किंवा परिचित व्यक्तीसाठी जामीनदार म्हणून सही केली जाते. मात्र कर्जदाराने कर्जाची परतफेड केली नाही तर त्या कर्जाची जबाबदारी जामीनदारावरही येऊ शकते. त्यामुळे कर्जदार आणि जामीनदार दोघांनाही आर्थिक व्यवहारात समान जबाबदार मानले जाते..






जामीनदार कोणत्या कायद्यानुसार जबाबदार असतो ? जामीनदारीसंबंधी तरतुदी Indian Contract Act, 1872 या कायद्यात नमूद आहेत. या कायद्यातील कलम १२८ नुसार कर्जदार आणि जामीनदार यांची जबाबदारी समान (Co-extensive liability) असते. म्हणजेच कर्जदाराने कर्जाची परतफेड न केल्यास बँक किंवा पतसंस्था थेट जामीनदाराकडूनही कर्जाची वसुली करू शकतात.

या कायद्यानुसार जामीनदार हा कर्ज व्यवहारातील बंधनकारक (Legally Binding) घटक मानला जातो. कर्जदाराने कर्जाची परतफेड केली नाही तर जामीनदाराला ती रक्कम भरण्याची जबाबदारी येते. त्यामुळे जामीनदार म्हणून सही करताना संबंधित व्यक्तीने पूर्ण माहिती घेऊनच निर्णय घेणे आवश्यक असते. काही प्रकरणांमध्ये बँका कर्ज वसुलीसाठी Securitisation and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest Act, 2002 (SARFAESI Act) अंतर्गतही कारवाई करू शकतात. या कायद्यानुसार बँकांना कर्जदार किंवा जामीनदाराच्या तारण मालमत्तेवरही कारवाई करण्याचा अधिकार आहे.यामुळे कर्ज व्यवहारात जामीनदार म्हणून सही करणे ही अत्यंत महत्त्वाची जबाबदारी ठरते. जामीनदाराने सही केल्यानंतर तो त्या कर्जाच्या कराराशी पूर्णपणे बांधील राहतो आणि कर्जदाराने कर्ज तर जामीनदारालाही त्याची आर्थिक व कायदेशीर जबाबदारी घ्यावी लागते.

जामीनदार होण्यापूर्वी लक्षात ठेवा या महत्त्वाच्या गोष्टी– कर्जदाराची आर्थिक स्थिती व उत्पन्न तपासा, कर्जाची रक्कम व्याजदर व हप्त्यांची माहिती घ्या. कर्जाचा उद्देश आणि कालावधी समजून घ्या कर्जाच्या करारातील सर्व अटी नीट वाचा कर्जाशी संबंधित कागदपत्रांची प्रत स्वतःकडे ठेवा रिकाम्या कागदावर किंवा अपूर्ण फॉर्मवर सही करू नका कर्जदार हप्ते वेळेवर भरत आहे का ते अधूनमधून तपासा स्वतःच्या आर्थिक क्षमतेचा विचार करूनच जामीनदार व्हा

कर्जाची परतफेड वेळेत न केल्यास होणारे परिणाम

क्रेडिट स्कोर (CIBIL) खराब होतो

भविष्यात बँक किंवा पतसंस्थेकडून कर्ज मिळणे कठीण होते दंड व अतिरिक्त व्याज आकारले जाऊ शकते

बँक किंवा संस्थेकडून कायदेशीर प्रक्रिया सुरू होऊ शकते मीनदाराकडून वसुलीची प्रक्रिया सुरू होऊ शकते

काही प्रकरणांमध्ये मालमत्ता जप्तीची कारवाई होऊ शकते.


वसुली प्रक्रियेदरम्यान गैरवर्तन केल्यास : कर्जदाराने हप्ते थकवले असता बँक किंवा पतसंस्था प्रथम फोन, संदेश किंवा पत्राद्वारे संपर्क साधतात. आवश्यक असल्यास कर्मचारी कर्जदाराच्या घरी भेट देऊन कर्ज परतफेडीबाबत चर्चा करतात. मात्र काही वेळा कर्जदार फोन न उचलणे, वारंवार संपर्क टाळणे, उलटसुलट बोलणे किंवा वसुलीसाठी आलेल्या कर्मचाऱ्यांशी अपमानास्पद वर्तन करणे असे प्रकार घडतात. अशा परिस्थितीत संबंधित व्यक्तीविरुद्ध Bharatiya Nyaya Sanhita, 2023 अंतर्गत तक्रार दाखल केली जाऊ शकते. कर्मचाऱ्यांना धमकी देणे, त्रास देणे किंवा त्यांच्या कामात अडथळा निर्माण करणे हा गुन्हा मानला जातो व अशा प्रकरणांमध्ये संबंधित व्यक्तीविरुद्ध पोलिस तक्रार दाखल होऊ शकते आणि प्रकरणानुसार दंड किंवा कारावासाची शिक्षा होण्याची शक्यता असते.

निष्कर्ष– कर्ज व्यवहारांमध्ये कर्जदार आणि जामीनदार दोघांचीही जबाबदारी महत्त्वाची असते. कर्जदाराने वेळेवर हप्ते भरल्यास कोणतीही अडचण निर्माण होत नाही. मात्र हप्ते थकवले तर त्याचा परिणाम जामीनदारावरही होऊ शकतो. त्यामुळे कर्ज घेताना तसेच जामीनदार होताना सर्व अटी व जबाबदाऱ्या समजून घेणे अत्यंत आवश्यक असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले आहे.

**– डॉ. डी. बी. शिंदे**
**अध्यक्ष, शांताई अर्बन को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, बीड**
**९४०५७९७०७०**

# मतदार यादी पडताळणी प्रक्रिया (एस आय आर ) नागरिकांनी भीती व संभ्रम बाळगू नये - तहसीलदार शेळके

लोकशाही व्यवस्थेचा सर्वात महत्त्वाचा पाया म्हणजे मतदानाचा अधिकार . नागरिकांनी आपल्या प्रतिनिधींची निवड करण्यासाठी दिलेला मताचा अधिकार हा लोकशाहीच्या बळकटीसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो . या संपूर्ण प्रक्रियेचा आधार असतो तो म्हणजे मतदार यादी . मतदार यादी अचूक , अद्ययावत आणि पारदर्शक राहणे ही लोकशाहीची मूलभूत गरज आहे . त्यामुळे भारत निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी मतदार यादीचे पुनरावलोकन , सुधारणा आणि अद्ययावत प्रक्रिया राबविली जाते . सध्या मतदार यादी पडताळणी व विशेष सघन पुनरावलोकन ( एस आय आर ) प्रक्रियेबाबत काही नागरिकांमध्ये संभ्रम किंवा भीती निर्माण झाल्याचे दिसून येत आहे . काही ठिकाणी अपुरी किंवा चुकीची माहिती पसरत असल्याने मतदारांमध्ये अनावश्यक गैरसमज निर्माण होत आहेत . प्रत्यक्षात ही प्रक्रिया नागरिकांच्या मतदान हक्काचे संरक्षण करण्यासाठी आणि मतदार यादी अधिक अचूक करण्यासाठी राबविली जात आहे . त्यामुळे नागरिकांनी कोणतीही भीती न बाळगता प्रशासनाला सहकार्य करावे , असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे .



भारतामध्ये मतदार यादी तयार करण्याची प्रक्रिया भारतीय संविधान आणि जनप्रतिनिधी कायदा १९५० व १९५१ अंतर्गत ठरविण्यात आलेली आहे . भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक राज्यात मतदार यादी तयार केली जाते . जिल्हाधिकारी हे संबंधित जिल्ह्याचे जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहतात . त्यांच्या अधिपत्याखाली उपविभागीय अधिकारी , तहसीलदार , नायब तहसीलदार तसेच मतदान केंद्र स्तरावर नियुक्त करण्यात आलेले केंद्रस्तरीय अधिकारी हे मतदार नोंदणी आणि पडताळणीचे काम करतात . मतदार यादी तयार करताना नागरिकांचे नाव , पत्ता , वय , मतदान केंद्र तसेच इतर आवश्यक तपशील नोंदविले जातात . नागरिकांचे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्यांना मतदार म्हणून नोंदणी करता येते . या प्रक्रियेमुळे प्रत्येक पात्र नागरिकाला मतदानाचा अधिकार मिळतो .

लोकसंख्या वाढ , स्थलांतर , मृत्यू किंवा नवीन मतदारांची नोंदणी यामुळे मतदार यादी वेळोवेळी बदलत राहते . त्यामुळे भारत निवडणूक आयोगाकडून नियमितपणे मतदार यादी पुनरावलोकन प्रक्रिया राबविली जाते . या प्रक्रियेत नवीन मतदारांची नोंदणी , मृत किंवा स्थलांतरित मतदारांची नावे वगळणे , मतदारांच्या तपशीलात सुधारणा , मतदान केंद्रांची पुनर्रचना तसेच डिजिटल मतदार यादी अद्ययावत करणे या महत्त्वाच्या बाबींची अंमलबजावणी केली जाते . यामुळे मतदार यादी अधिक अचूक आणि पारदर्शक राहते .

पुनरावलोकन प्रक्रिया राबविली जाते . या प्रक्रियेत जुन्या मतदार यादीतील नोंदी तपासून त्या अद्ययावत करण्याचे काम केले जाते . मात्र सध्या प्रत्यक्ष पुनरावलोकन प्रक्रिया सुरू झालेली नसून त्याची पूर्वतयारी सुरू आहे . या टप्प्यात २००५ सालातील मतदार यादी आणि २०२४ – २५ मधील विद्यमान मतदार यादी यांचे परस्पर जुळवणीचे काम चालू आहे .

बीड तालुका हा बीड , गेवराई आणि केज या विधानसभा मतदारसंघांमध्ये विभागलेला आहे . आजच्या घडीला बीड तालुक्याची एकूण मतदार संख्या ४ , ५१ , २२५ इतकी आहे . त्यामध्ये पुरुष मतदार २ , ३७ , ६४४ असून स्त्री मतदार २ , १३ , ५६९ आहेत . सध्या तालुक्यात ४५७ मतदान केंद्रांच्या माध्यमातून मतदारांचे मतदार ते मतदार आणि मतदार ते कुटुंब अशा पद्धतीने जुळवणीचे काम सुरू आहे . ज्या मतदारांचे जुळवणीचे काम पूर्ण होऊ शकलेले नाही अशा मतदारांची स्वतंत्र यादी तयार करण्यात येत आहे . प्रत्यक्ष सघन पुनरावलोकन प्रक्रिया सुरू झाल्यानंतर सर्व केंद्रस्तरीय अधिकारी आपल्या कार्यक्षेत्रातील गाव , प्रभाग आणि मतदान केंद्र क्षेत्रात जाऊन प्रत्येक मतदाराच्या कुटुंबाशी संपर्क साधतील . त्या वेळी २००५ च्या मतदार यादीतील संदर्भ तपासले जातील आणि मतदारांची नोंद परस्पर जुळवणीद्वारे जोडली जाईल . जर त्यानंतरही काही मतदारांची जुळवणी होऊ शकली नाही , तर अधिकारी पुन्हा घरभेट देऊन संबंधित मतदारांकडून निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या तेरा ओळखपत्रांपैकी एक ओळख पुरावा स्वीकारतील आणि आयोगाच्या विहित नमुन्यातील अर्ज भरून घेतील .

या संपूर्ण प्रक्रियेमध्ये कोणताही पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये याची विशेष दक्षता प्रशासनाकडून घेतली जात आहे . त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये , असे आवाहन करण्यात आले आहे .निवडणूक आयोगाने नागरिकांना माहिती सहज उपलब्ध व्हावी यासाठी विशेष मोबाईल अनुप्रयोग उपलब्ध करून दिला आहे . या माध्यमातून नागरिकांना जुनी मतदार यादी तपासता येते . अनुप्रयोगामध्ये मतदार नोंदणी अर्ज , मागील पुनरावलोकनातील नाव शोधा आणि मतदार तपशीलाच्या आधारे शोधा असे पर्याय उपलब्ध आहेत . नाव सापडल्यानंतर त्यातील मतदारसंघ , भाग क्रमांक आणि अनुक्रमांक ही माहिती संबंधित केंद्रस्तरीय अधिकाऱ्याकडे दिल्यास पुढील प्रक्रिया सुलभ होते . बीड जिल्ह्यात मतदार यादी पडताळणीचे काम जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे . निवडणूक विभागाचे उपजिल्हाधिकारी मनोज घोडे पाटील यांच्या समन्वयातून संपूर्ण जिल्ह्यातील निवडणूक यंत्रणा कार्यरत आहे . बीड उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकास्तरावर पडताळणी प्रक्रिया प्रभावीपणे राबविली जात आहे . तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनीही नागरिकांशी संवाद साधत मतदार नोंदणी आणि पडताळणी प्रक्रियेत सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे .बीड तहसील कार्यालयाच्या माध्यमातून मतदार यादी पडताळणीचे काम वेगाने सुरू आहे . निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार सुरेंद्र डोके यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण पथक कार्यरत आहे . तलाठी , मंडळ अधिकारी , महसूल कर्मचारी आणि केंद्रस्तरीय अधिकारी यांच्या समन्वयातून मतदार माहिती पडताळणीचे काम सुरू आहे . मतदान केंद्र स्तरावर काम करणारे केंद्रस्तरीय अधिकारी हे निवडणूक प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत . ते घरभेटी घेऊन माहिती पडताळणी करतात , नवीन मतदारांची नोंद करतात , मृत किंवा स्थलांतरित मतदारांची माहिती घेतात तसेच मतदारांना मार्गदर्शन करतात . त्यांच्या प्रयत्नांमुळे मतदार यादी अधिक अचूक आणि विश्वासार्ह बनते .

मतदार यादी पडताळणी प्रक्रिया ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून नागरिकांचाही सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे . नागरिकांनी आपले नाव मतदार यादीत तपासावे , चुकीची माहिती असल्यास दुरुस्ती करावी तसेच केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना आवश्यक माहिती द्यावी . यामुळे मतदान प्रक्रियेतील अडचणी टाळता येतात . जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , उपजिल्हाधिकारी मनोज घोडे पाटील , उपविभागीय अधिकारी कविता जाधव तसेच तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की मतदार यादी पडताळणी प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा आणि प्रशासनाशी सहकार्य करावे . तसेच सध्या फक्त पूर्वतयारीची प्रक्रिया सुरू असल्यामुळे आजच अधिकाऱ्यांकडून घरभेटीचा आग्रह करू नये . अंतिम टप्प्यात अधिकारी स्वतः मतदारांच्या घरी भेट देणार आहेत .

लोकशाहीची ताकद मतदारांच्या सहभागातून वाढते . प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत असणे ही लोकशाहीची गरज आहे . मतदार यादी अचूक ठेवण्यासाठी प्रशासन , केंद्रस्तरीय अधिकारी आणि नागरिक यांच्या संयुक्त प्रयत्नांची आवश्यकता आहे . एकत्रित प्रयत्नातून मतदार यादी अधिक अचूक आणि पारदर्शक बनू शकते. त्यामुळे सजग मतदार – मजबूत लोकशाही हा संदेश देत नागरिकांनी मतदार यादी पडताळणी प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा , असे प्रशासनाकडून आवाहन करण्यात आले आहे.

# नगरसेवक सदानंद भैय्या प्रधान यांच्या वाढदिवसानिमित्त 78 दात्यांचे रक्तदान, 100 महिलांना साडी, 295 विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील नगरसेवक सदानंद भैय्या प्रधान यांच्या वाढदिवसा निमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमात आयोजित रक्त दान शिबिरात ७८ दात्यांनी रक्त दान केले तर १००सफाई कामगार महिलांना साडी व जिल्हा परिषद प्रा.शाळेतील २९५विद्यार्थांना आवश्यक शैक्षणिक साहित्यांचे वाटप करण्यात आले. तसेच सेवार्थ



शिक्षण प्रसारक संस्थेच्या मुकबधी निवासी शाळेत विद्यार्थ्यांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. या सर्व कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणुन बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे,उपनगराध्यक्ष सहाल चाऊस,कृऊबासचे उपसभापती श्रीहरी मोरे,नगरसेवक अभिजित पोटभरे, अशोक लांडगे सह कचरुखळगे,नवनाथ धाईजे,संपादक सुभाष नाकलगावकर, प्रदीप पट्टेकर यांची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना बाबुराव पोटभरे म्हणाले की,सदानंद भैय्या हा प्रधान तरुणाईचे प्रतिनिधीत्व करणारा युवा नेता म्हणून लौकिक होत असुन वार्डातील गरजुंचे सतत काम एके काम करुन लोक सेवेचा वसा घेऊन कमी वयात नगरसेवक झाला,यापुढे जनतेच्या मनात स्थान निर्माण करणारे नेतृत्व भविष्यात मोठी भूमिका बजावेल अशी अपेक्षा पोटभरे यांनी व्यक्त केली. कार्यक्रमास माजलगाव शहरातील भीमनगर, बंजारानगर,जयभीमनगर,गौतम नगर,आझादनगर सह शहरातील नागरीक,विविध पक्ष संघटनेचे पदाधिकारी,कार्यकर्ते उपस्थित होते. सर्व उपक्रम यशस्वी करण्यासाठी राहुल मस्के,केतन प्रधान,राज सोनवणे,दिपक टाकणखार,मगरसर,मयूर प्रधान, शिशिर प्रधान,नवरत्न प्रधान यांच्या सह मित्र परिवाराने विशेष परिश्रम घेतले.

# युद्धामुळे ड्रायफ्रूट महागले ऐन रमजान दिवसांत नवीन आवक बंदचा परिणाम

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

आखाती देशांतील युध्दाची झळ इंधनाबरोबरच अंजीर, खजूर आदी ड्रायफ्रूटला बसली आहे. युध्दामुळे होर्मुज सामुद्रधुनी बंद असल्यामुळे इराण व आफगाणिस्थानातून होणारी अंजीर आणि खजूरची आवक बंद आहे. त्यामुळे ऐन रमजानमध्ये अंजीर व खजूर आदीच्या किंमती वाढल्या आहेत. याचा फटका मुस्लिम समाजातील गोरगरिब जनतेला बसला आहे. दरम्यान, नागरिकांची तसेच व्यावसायधारकांची सिलिंडरसाठी वणवण सुरुच आहे. युध्दजन्य परिस्थितीमुळे इंधन पुरवठा कमी झाल्याने वापरातील सिलिंडरचा पुरवठाच जवळपास बंद झाला. त्यामुळे हॉटेल, खानावळी तसेच रेस्टॉरंटचालकांची सिलिंडरसाठी वणवण सुरु आहे. मिळेल तेथून सिलिंडर चढ्या भावाने खरेदी केले जात आहे. जोडीला इलेक्ट्रिक शेगडीचा वापर करुन व्यवसाय सुरु ठेवला आहे. टंचाई अधिक दिवस चालली तर खानावळी देखील बंद होण्याची शक्यता वाढली आहे. याचा फटका महाविद्यालयीन विद्यार्थी व नोकरदारांना बसणार आहे.

शासनाने घरगुती गॅस सिलिंडरला प्राधान्य दिले आहे. सध्या घरगुती सिलिंडरचा तुटवडा नाही. नियमानुसार सिलिंडर वाटप सुरु असल्याचे जिल्हा प्रशासन सांगत आहे. अशा परिस्थितीत कामधंदा सोडून नागरिकांच्या गॅस एजन्सींपुढे उन्हातान्हात रांगा सुरुच आहेत. गेल्या काही दिवसांपासून गॅस सिलिंडरमुळे जनजीवन विस्कळीत झाल्याचे दिसत आहे.

सध्या रमजान सुरु आहे. मुस्लिम समाजाचे उपवासाचे दिवस सुरु आहेत. उपवास सोडण्यासाठी खजूर, अंजीर आदी ड्रायफ्रूट आवश्यक असल्याने मागणी वाढली आहे. परंतु युध्दजन्य परिस्थितीमुळे अंजीर, खजूर आदींची नवीन आवक नसल्याने उपलब्ध ड्रायफ्रटला मागणी वाढली आहे. त्यामुळे साहजिकच दर वाढले आहेत. एक हजार रुपये किमतीचे अंजीर आता अकराशे रुपयांना मिळत आहेत. तेराशे रुपये किलो अंजीर आता चौदाशे ते साडेचौदाशे दराने विकले जात असल्याचे पिंपळनेर येथील ड्रायफ्रूटचे डिलर यांनी सांगितले. खजूर किमंतीत देखील पेटीमागे ५० ते शंभर रुपये दर वाढल्याचे व्यापारी सांगत आहेत.

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाव्दारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार नामे 1) श्री.ज्ञानेश्वर रखमाजी थापडे रा. ढेकणमोहा 2) श्री. उमेश रामप्रसाद थापडे रा. ढेकणमोहा ता.जि.बीड यांनी 1. श्री. नागनाथ भागुजी जाधव रा. नाळवंडी ता. जि. बीड 2) श्रीमती वैशाली भागवत खाकरे रा.ढेकणमोहा ता. जि. बीड 3) श्री. भागवत सखाराम खाकरे, रा. वाकनाथपुर ता. जि. बीड यांचे मालकीचा व ताब्यात असलेला मौजे ढेकणमोहा ता. जि. बीड येथील 1) मालमत्ता क्रमांक 325/1 मधील ज्याची रुंदी दक्षिण- उत्तर 20 फुट व लांबी : पूर्व -पश्चिम 33 फुट, एकूण क्षेत्रफळ 660 चौरस फुट असून चतु:सिमा पुर्वेस : काळेगांव रस्ता, पश्चिमेस : श्रीमती वैशाली भागवत खाकरे, दक्षिणेस: श्री. रमेश इनामदार, उत्तरेस : श्री. पदमाकर साळवे या प्रमाणे आहे. तसेच 2) मालमत्ता क्रमांक 324/1मधील ज्याची रुंदी दक्षिण- उत्तर 33 फुट व लांबी : पूर्व -पश्चिम 33 फुट, एकूण क्षेत्रफळ 1089 चौरस फुट असून चतु:सिमा पुर्वेस : श्री. नागनाथ भागुजी जाधव, पश्चिमेस : तुळजाभवानी मंदिराकडे जाणारा रस्ता, दक्षिणेस: श्री. रमेश इनामदार, उत्तरेस : श्री. भागवत सखाराम खाकरे या प्रमाणे, व 3) मालमत्ता क्रमांक 324/2 1मधील ज्याची रुंदी दक्षिण- उत्तर 33 फुट व लांबी : पूर्व -पश्चिम 33 फुट, एकूण क्षेत्रफळ 1089 चौरस फुट असून चतु:सिमा पुर्वेस : श्री. पदमाकर साळवे ,श्री. नागनाथ भागुजी जाधव, पश्चिमेस : तुळजाभवानी मंदिराकडे जाणारा रस्ता, दक्षिणेस: श्रीम.वैशाली भागवत खाकरे, उत्तरेस : पशुवैद्यकीय दावाखान्याकडे जाणारा रस्ता येणे प्रमाणे वर्णन असलेला बांधकामासह सहन प्लॉट माझे पक्षकारांनी कायम खरेदी करण्याचा ठराव केला असून विक्रेत्याने सदरील प्लॉट निर्वीवार असल्याची खात्री दिली आहे. या उपर सदर प्लॉटमध्ये जर कोणाचे काही हितसंबंध जसे की इसारपावती, खरेदीखत, गहाणखत, बक्षीसपत्र, आममुखत्यारपत्र इत्यादी स्वरुपाचे असतील तर संबंधीतांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेपासून 8 दिवसाचे आत योग्य त्या पुराव्यासह खालील पत्यावर आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत जर कोणाचा काही आक्षेप आला नाही तर सदरील प्लॉट निर्विवाद आहे असे समजून माझे पक्षकार सदर प्लॉटचे कायदेशिर खरेदीखत करुन घेतील, त्यानंतर कोणाचा कसलाही आक्षेप चालणार नाही.

सबब हे जाहीर प्रगटन.

ठिकाण- बीड

**- जाहीर प्रगटन देणार**

**1.श्री.ज्ञानेश्वर रखमाजी थापडे**
**2. श्री. उमेश रामप्रसाद थापडे रा. ढेकणमोहा ता.जि.बीड**
**मो.** 9421335066

**मार्फत**
**ॲड.श्री. चंद्रकांत आर.माने,**
**जिल्हा व सत्र न्यायालय बीड**
**मो. 9860555076**

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# दैनिक मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • रविवार दि. १५ मार्च २०२६ •

## थोडक्यात...

### प्राथमिक आरोग्य केंद्र नायगाव येथे एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा उत्साहात शुभारंभ



**पाटोदा । प्रतिनिधी**

महिलांमध्ये वाढत्या प्रमाणात आढळणाऱ्या गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण मिळावे यासाठी शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या एचपीव्ही (HPV) लसीकरण मोहिमेचा शुभारंभ प्राथमिक आरोग्य केंद्र नायगाव येथे उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला. या कार्यक्रमाला आरोग्य विभागातील अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेविका, आशा कार्यकर्त्या तसेच इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते लसीकरण मोहिमेचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. यावेळी आरोग्य अधिकाऱ्यांनी उपस्थितांना एचपीव्ही लसीचे महत्त्व समजावून सांगत गर्भाशय मुखाच्या कर्करोगासारख्या गंभीर आजारापासून बचाव करण्यासाठी ही लस अत्यंत प्रभावी असल्याचे सांगितले. योग्य वयातील मुलींना ही लस दिल्यास भविष्यात होणाऱ्या या आजाराचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतो, असेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच या मोहिमेअंतर्गत परिसरातील शाळांमध्ये जाऊन मुलींना लसीकरणाबाबत जनजागृती करण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. पालकांनी आपल्या मुलींना वेळेवर एचपीव्ही लस देऊन त्यांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले.या लसीकरण मोहिमेमुळे ग्रामीण भागातील मुलींना आरोग्य संरक्षण मिळण्यास मोठी मदत होणार असून समाजामध्ये कर्करोगाविषयी जागरूकता निर्माण होण्यासही हातभार लागणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र नायगाव येथील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली.या प्रसंगी वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा कार्यकर्त्या व स्थानिक नागरिक उपस्थित होते.

### जय महेश साखर कारखान्याकडून ऊसाचे बील रखडले ; शेतकरी आर्थिक संकटात

**माजलगाव । प्रतिनिधी**

परिसरातील शेतकऱ्यांनी जय महेश साखर कारखान्ऊयाकडे दिलेल्या ऊसाचे बील अद्यापही थकीत असल्याने शेतकरी वर्गात तीव्र नाराजी पसरली आहे. चालू गाळप हंगामात अनेक शेतकऱ्यांनी मोठ्या विश्वासाने आपला ऊस जय महेश कारखान्याकडे पाठवला होता. मात्र गाळप पूर्ण होऊन बराच कालावधी उलटूनही ऊसाचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले नसल्याची तक्रार शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. ऊस शेती ही मोठ्या खर्चाची शेती मानली जाते. खत, औषधे, मजुरी, पाणीपुरवठा आणि वाहतूक यासाठी शेतकऱ्यांना मोठा खर्च करावा लागतो. अनेक शेतकरी शेतीसाठी बँका किंवा पतसंस्थांकडून कर्ज घेतात. अशा परिस्थितीत ऊसाचे बील वेळेवर मिळाले नाही तर शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. सध्या अनेक शेतकरी कर्जफेड, शेतीची पुढील तयारी आणि घरगुती खर्च यासाठी पैशांची वाट पाहत आहेत. स्थानिक शेतकऱ्यांनी सांगितले की, कारखान्याकडे वारंवार पाठपुरावा करूनही समाधानकारक उत्तर मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता वाढत असून लवकरच थकीत बिलाचा प्रश्न मार्गी लावला नाही तर आंदोलनाचा इशाराही काही शेतकऱ्यांनी दिला आहे. दरम्यान, कारखाना प्रशासनाकडून आर्थिक अडचणीमुळे काही प्रमाणात विलंब झाल्याची माहिती मिळत असून

## सुरत चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्ग भूसंपादन प्रकरणी शेतकऱ्यांना...

# जमिनीचा योग्य मोबदला देण्यासाठी प्रयत्न करणार: आ. सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**

सुरत ते चेन्नई हा राष्ट्रीय ग्रीन फिल्ड महामार्ग आष्टी तालुक्यातील १९ गावांमधून जात असून या महामार्गासाठी शेतकऱ्यांच्या बहुमोल किमतीच्या जमिनी भूसंपादित करण्यात येणार असल्याने या संपादित जमिनींवरील फळबागा, वृक्ष लागवड, घरांचे बांधकाम, पत्रांचे शेड्स, विहिरी खोदकाम या सर्व संपत्तीचे मूल्यमापन योग्य पद्धतीने करून शेतकऱ्यांना महामार्ग प्राधिकरणाने जमिनीचा योग्य मोबदला देण्यात यावा यासाठी आपण जिल्हाधिकारी बीड यांच्याशी आणि आवश्यकता वाटल्यास वरिष्ठ अधिकारी यांच्याशी चर्चा करणार आहोत अशी माहिती आमदार सुरेश धस यांनी याबाबतच्या प्रशासन आणि संबंधित शेतकरी त्यांचे संयुक्त बैठकीमध्ये बोलताना दिलीआज या महत्वपूर्ण विषयाच्या बैठकीसाठी पाटोदा विभागीय अधिकारी श्रीमती वसीमा शेख



आणि राष्ट्रीय महामार्ग जीवन प्राधिकरण विभागाचे अधिकारी आणि नायब तहसीलदार पांडुरंग माढेकर नायब तहसीलदार आणि १९ गावातील संबंधित शेतकरी हे उपस्थित होते.आष्टी तालुक्यातील नांदूर ते पारगाव जोगेश्वरी या दरम्यानच्या १९ गावांमधून हा राष्ट्रीय ग्रीनफिल्ड महामार्ग जात असून सुमारे ३८ किलोमीटर अंतराचा असून त्यासाठी २०० ते २२५ हेक्टर्स जमिनीचे भूसंपादन करण्यात येणार आहे या महामार्गाचे ऑगस्ट २० २२ मध्ये ड्रोन सर्वेक्षण झाले त्यानंतर सप्टेंबर २३ मध्ये नोटिफिकेशन प्रकाशित होण्याच्या दरम्यान या महामार्गावरील असेट्स मध्ये वाढ झाली आहे असा दावा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण केला असताना संबंधित गावातील शेतकऱ्यांनी सर्वेक्षण करताना अनेक ठिकाणी चुका झाल्या असून फळबागांचे मोघम स्वरूपात मूल्यांकन करण्यात आले असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होणार आहे असे प्रतिपादन शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात आले भूसंपादित करण्यात आलेल्या जमिनीच्या मूल्यांकनाबाबत उपविभागीय अधिकारी श्रीमती वसीमा शेख यांनी शेतकऱ्यांच्या बाजूने सहानुभूतीने विचार करण्यात येणार असून रेडी रेकनर सह प्रचलित मूल्यदर ▶▶ उर्वरित पान २ वर

# सराफांची जिल्हास्तरीय कमिटी स्थापन करणार: पोलिस अधीक्षक नवनीत काँवत

- पोलीस अधीक्षक नवनीत कावत एलसीबी चे पीआय शिवाजी बंटेवाड यांचा सत्कार संपन्न
- माजलगावात सराफ सुवर्णकार असोसिएशनचा भव्य मार्गदर्शक मेळावा संपन्न

**माजलगाव । प्रतिनिधी**

शासनाच्या परिपात्रानुसार सराफांची जिल्हास्तरीय कमिटी स्थापन करण्यात येणार आहे. त्यासाठी प्रत्येक तालुक्यातून सराफा व्यापाऱ्यांचे दोन - दोन प्रतिनिधीची निवड करत ती नावे शासनाकडे पाठवले जाणार असल्याचे पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी सांगितले.

माजलगाव येथील सराफ सुवर्णकार असोसिएशनच्या वतीने (आयपीसी ४११ /बीएनएस ३१७) संदर्भात




सुवर्णकार व्यापाऱ्यांना कायदेशीर मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने आयोजित मार्गदर्शक मेळावा व कर्तव्यदक्षता व जनसेवा गौरव मेळावा कार्यक्रमात बोलत होते. पुढे बोलतांना पोलिस अधीक्षक नवनीत काँवत म्हणाले की, सराफ व्यापाऱ्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा प्रत्येक दुकानदारांनी आपल्या दुकानासमोर सीसीटीव्ही लावावेत आणि सोने विकायला आलेला खरेदीसाठी आलेला या माणसांची पारख करावी. अनोळखी माणसाकडून सोने खरेदी करू नये तसेच सराफी व्यापाऱ्यांचे एखाद्या गुन्हेगाराने नाव घेतले तर त्या व्यापाऱ्यास पोलीस लगेच अटक ▶▶ उर्वरित पान २ वर

### गडकोट विकास महामंडळ मागणीवर आश्वासन ; किसन पाटील यांचे उपोषण स्थगित




**बीड । प्रतिनिधी**

स्वराज्यातील गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी गडकोट विकास महामंडळ स्थापन करण्याच्या मागणीसाठी सुरू असलेले आमरण उपोषण अखेर स्थगित करण्यात आले. जागर प्रतिष्ठान चे अध्यक्ष किसन प्रभाकर चव्हाण यांनी प्रशासन व लोकप्रतिनिधींशी झालेल्या चर्चे नंतर उपोषण स्थगित करण्याचा निर्णय जाहीर केला. गेल्या काही दिवसांपासून तुळजापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक तुळजापूर येथे गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी हे आंदोलन सुरू होते. या आंदोलनाला राज्यभरातून शिवप्रेमी व विविध सामाजिक संघटनांचा पाठिंबा मिळत होता. दरम्यान, शासनाकडून मागण्यांबाबत सकारात्मक चर्चा करण्याचे ▶▶ उर्वरित पान २ वर

# मेंढपाळांसह ओबीसी समाजावरील हल्ले कदापी सहन करणार नाही: ॲड. सुभाष भाऊ राऊत

- घळाटवाडी मारहाण प्रकरणी आरोपींना अटक करण्याची समता परिषदेची मागणी

**माजलगाव । प्रतिनिधी**



तालुक्यातील घळाटवाडी येथे मेंढपाळ बांधवांवर झालेल्या मारहाणीच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर परिसरात संतापाची लाट उसळली आहे. या घटनेचा निषेध नोंदवत ओबीसी नेते तथा समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष भाऊ राऊत यांनी जिल्हाधिकारी बीड यांना निवेदन देऊन आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी केली आहे. यावेळी बोलताना ड.सुभाष भाऊ राऊत म्हणाले की, राज्यात वारंवार मेंढपाळासह ओबीसी समाजावर हल्ल्यांच्या घटना घडत असल्यामुळे कायद्याचे राज्य आहे की नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे? ओबीसी समाजावर अन्याय होत असताना आम्ही शांत बसणार नाही. समाजबांधवांनी अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहावे, असे आवाहन त्यांनी केले. दरम्यान ॲड. सुभाष भाऊ राऊत यांनी मारहाण झालेल्या बीटे बंधूंच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांना धीर दिला आहे. न्याय मिळवून देण्यासाठी आपण त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करावी, अन्यथा धनगर समाजासह ओबीसी समाजाच्यावतीने माजलगाव पोलिस ठाण्यावर मोर्चा काढण्यात येईल असा इशाराही ॲड. सुभाष भाऊ राऊत यांनी दिला आहे. यावेळी समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष भाऊ राऊत यांच्यासह श्री संत शिरोमणी नरहरी महाराज जयंती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. संदीप बेदरे, पांचाळ समाज सोनार संघटनेचे अध्यक्ष बाबासाहेब पंडित, समता परिषदेचे बीड शहराध्यक्ष निखिल शिंदे, युवा नेते नितीन राऊत, धनंजय काळे यांच्यासह धनगर समाजासह ओबीसी समाजाचे अनेक बांधव उपस्थित होते.

# पत्रकार संघ आणि लाईफस्टाईल जीमच्या वतीने रोजा इफ्तार पार्टी उत्साहात संपन्न

### संवेदनाशील जिल्ह्यामध्ये अशा सामाजिक उपक्रमांची नितांत गरज – उपस्थितांची मते

**बीड । प्रतिनिधी**

पवित्र रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर पत्रकार संघ आणि लाईफस्टाईल जीमच्या वतीने शुक्रवार, दिनांक १३ मार्च २०२६ रोजी लाईफस्टाईल जीम,नवी भाजी मंडई येथे रोजा इफ्तार पार्टी मोठ्या उत्साही वातावरणात संपन्न झाली. या कार्यक्रमात पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटनांचे पदाधिकारी तसेच मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहिले होते.

दैनिक समर्थ राजयोगचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव



स्वामी आणि लाईफस्टाईल जीमचे संस्थापक बॉडी बिल्डिंगचे नॅशनल जज, इंटरनॅशनल कोच डॉ.सय्यद अरशियानउल्लाह मिसबाहउल्लाह सर यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दिनांक १३ मार्च २०२६ रोजी रोजा इफ्तार पार्टी मोठ्या उत्साही आणि आनंदी वातावरणामध्ये संपन्न झाली. या आयोजित इफ्तारच्या निमित्ताने सर्व धर्मीय नागरिक एकत्र येत बंधुभाव, सामाजिक ऐक्य आणि परस्पर सलोखा याचा सुंदर संदेश देण्यात आला. रमजान हा संयम, त्याग, सेवा आणि मानवतेचा संदेश देणारा पवित्र महिना असून समाजात शांतता, सद्भावना आणि एकात्मता टिकवून ठेवण्याचे महत्त्व उपस्थित मान्यवरांनी यावेळी अधोरेखित केले. बीड सारख्या संवेदनशील जिल्ह्यामध्ये अशा उपक्रमाचे आयोजन ▶▶ उर्वरित पान २ वर

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान तळेगाव येथे उत्साहात संपन्न

- विभागीय आयुक्त पापळकर यांच्या उपस्थितीमुळे ग्रामस्थ भारावले

**बीड । प्रतिनिधी**

शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत तळेगाव येथे १४ मार्च शनिवारी आयोजित करण्यात आलेले छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान नागरिकांच्या उत्स्फूर्त



प्रतिसादात आणि उत्साही वातावरणात संपन्न झाले . तळेगाव येथील ग्रामपंचायत परिसरात आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरामध्ये शेतकरी , ग्रामस्थ , महिला बचत गट , विद्यार्थी तसेच विविध सामाजिक घटकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासनाच्या विविध सेवांचा लाभ घेतला. सर्वप्रथम पारधी समाजातील १७ कुटुंबांना विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर , जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांच्या हस्ते घरकुलाचे वाटप करण्यात आले . १७ लाभार्थी कुटुंबाना नमुना ८अ (पीटीआर) वाटप करण्यात आले . यावेळी एका घरकुलाचे भूमिपूजन करण्यात आले. राज्य शासनाने महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख , पारदर्शक आणि गतिमान करण्याच्या उद्देशाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने हे महाराजस्व अभियान सुरू केले आहे . नागरिकांना महसूल विभागाच्या विविध सेवा त्यांच्या गावातच उपलब्ध करून देणे , प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करणे तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती तळागाळापर्यंत पोहोचवणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे . तळेगाव येथे आयोजित शिबिराने या उद्दिष्टांना प्रत्यक्ष स्वरूप दिले असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते . कार्यक्रमास विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर , अप्पर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , उपविभागीय अधिकारी कविता जाधव , तहसीलदार चंद्रकांत शेळके यांची प्रमुख उपस्थिती लाभली . प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीमुळे या शिबिराला विशेष महत्त्व प्राप्त झाले . कार्यक्रमास राजेंद्र मस्के , बळीराम गवते , सर्जेराव तात्या तांदळे , जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे , डॉक्टर नरेश कासट तालुका आरोग्य अधिकारी बीड , डॉक्टर दत्तात्रय राऊत वैद्यकीय अधिकारी राजुरी नवगण , डॉक्टर तनुजा शेटे समुदाय आरोग्य अधिकारी तळेगाव , सरपंच अश्विनीताई उद्धवराव घोलप , उपसरपंच बबन एकनाथ काकडे तसेच महसूल विभागातील अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते . यामध्ये निवासी नायब तहसीलदार सुहास हजारे , नायब तहसीलदार प्रशांत जाधवर , निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार सुरेंद्र डोके , नायब तहसीलदार अण्णासाहेब वंजारे , पुरवठा निरीक्षक प्रशांत सुपेकर , उपाधीक्षक भूमि अभिलेख अनिल शिवणकर , आरोग्य विभागाचे आरोग्य निरीक्षक अशोक लोखंडे , राज्य परिवहन महामंडळाचे पंकज गोरे , तलाठी मंडळ अधिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम आंधळे , महादेव चौरे , दादासाहेब शेळके तसेच बीड तालुक्यातील महसूल मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी , महसूल सेवक आणि तहसील कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते .राजुरी नवगन ▶▶ उर्वरित पान २ वर